# सख्य महिला मार्गदर्शन केंद्र

स्त्री सबलीकरणातून स्त्रीपुरूष समानता

# हुंकार

वर्ष : ८वे  अंक : २६ वा  फेब्रुवारी २०२०


महिला मार्गदर्शन केंद्र

सख्य

हिंसा थांबवा

## या अंकात....


* एक समान जग
* स्त्रीच आहे स्त्रीमुक्तीचा आधार
* एक संधी समानतेची
* Women Also Love To Ride
* समान जग, सक्षम जग
* एक समान जग
* समाज कार्य शिक्षण घेणाऱ्या S.N.D.T कॉलेजच्या विद्यार्थीनीचे..
* समाज कार्य शिक्षण घेणाऱ्या S.N.D.T कॉलेजच्या विद्यार्थीनीचे..
* त्रैमासिक अहवाल



* प्रकाशक
  शैला क्रास्टो
* संपादिका
  मेरी वनमाळी

* सख्य परिवार *

शैला क्रास्टो
नॅटी लोपीस
मेरी वनमाळी
शालीनी जाधव
विद्या पाटील
रूशीला रिबेलो
नित्ता चव्हाण
अरूणा सावंत
डेलिना लोपीस
पार्वती दादोडा


प्रकाशकीय

## एक समान जग



समानता हा शब्द बऱ्याचदा आपण फार सहजतेने उच्चारतो पण आपल्या वागणुकीत मात्र तो सहजपणे येत नाही. समानतेचा पाया हा एकमेकांना स्वातंत्र्य देणं व हे स्वातंत्र्य आनंदाने मान्य करणं यावर उभा असतो. यातील स्वातंत्र्य आणि आनंद हे शब्द महत्त्वाचे. स्वातंत्र्याचा संबंध व्यक्तीशी असतो. आपण एकमेकांना जोवर "मी स्त्री व तू पुरुष" म्हणून "मी असं वागेन आणि तू तसं वागायचं" असं प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे सांगू तोवर हे स्वातंत्र्य येणार नाही. तिथं गुलामीच नांदेल. त्यांना स्वातंत्र व्यक्तिमत्व नसते. व्यक्ती म्हणून त्यांना फार अधिकार नसतात. त्यामुळे आधी हा व्यक्तीपणा अंगात रूजायला हवा तो आला की त्याच्यासोबत स्वातंत्र्य येतं. फक्त ते कोणा एकाचं स्वातंत्र्य नको. ते एकाचवेळी दोघाचंही स्वातंत्र्य हवं, हे स्वातंत्र्य दोघांनाही मान्य हवं आणि तेही आनंदानं, नाईलाज म्हणून नको, या अटी पूर्ण झाल्या तर खरी समानता येऊ शकेल.

आपल्याला एक समान जग निर्माण करायचे असेल तर आपल्या विचारात बद्दल घडवून आणणे आवश्यक आहे. एकमेकांचा व्यक्ती म्हणून आदर करणं, आपल्यात गुण-दोष असतात हे स्वीकारणं,एकमेकांच्या स्वातंत्र्याचा संकोच न करणं, एकमेकांच्या विकासासाठी सहकार्य करणं यामुळे खरी समानता येईल पण स्त्रियांवर अधिकार गाजविण्याची सूत्रे पिढ्यान्‌पिढ्या पुरुषांनी आपल्या हातात ठेवल्यामुळे बाईचे भवितव्य किंवा प्रगती अधोगतीला गेली आहे. पुरुषांनी बाईवर वर्चस्व गाजविणे, ही गोष्ट नैसर्गिक नाही. पण ती तशी आहे, असे सतत सांगितल्यामुळे ही गोष्ट कायमची मान्य केल्यासारखे झाले आहे.

आपण एक समान जगाचा विचार करत असताना स्त्रिया आज नेमक्या कुठे आहेत, याचा विचार करावा लागेल. समाजजीवन हा नदीप्रमाणे एक वाहता प्रवाह आहे असे मानले तर या प्रवाहाच्या मध्यभागी प्रामुख्याने पुरुष आहेत. ते स्वतःच्या क्षमतेप्रमाणे शिक्षण घेऊ शकतात. स्वयंनिर्भर, स्वतंत्र जीवन जगू शकतात, स्पर्धात्मक जगात पुढे जाण्यासाठी


सख्य कार्यालय : सिल्वेस्टर स्मृती, पहिला मजला, पोलीस चौकीच्यासमोर, कळंब रोड, निर्मळ नाका, नालासोपारा (प), ता. वसई, जि. पालघर, पिन - ४०१३०४ वेळ - सोमवार ते शनिवार सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.००
मोबाईल - 9890312402, Email Id - sakhya_87@rediffimail.com.
Website : www.sakhyawgc.org, facebook : Sakhyawomen'sGuidance Cell
सख्य' ठाणे विस्तारीत शाखा : सिव्हील हॉस्पिटल, ओपीडीच्या समोर, तळमजला, टेंभी नाका, अग्यारी लेन, ठाणे (प.)
वेळ - सोमवार ते शनिवार सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० वाजता. मोबाईल : 9224642560

आवश्यक ती परिस्थिती आपल्या भोवती निर्माण करू शकतात. या तुलनेमध्ये फार थोड्या प्रमाणामध्ये स्त्रिया या मुख्य प्रवाहात आहेत असे लक्षात येईल. बहुसंख्य स्त्रिया आजही काठावरचे जीवन जगत आहेत. अद्यापही धार्मिक चौथऱ्यावर प्रवेशासाठी स्त्रीला भांडावे लागत आहे.

एका समान जगाची सुरुवात कुटुंबापासून होऊ शकते. कुटुंबात वापरलेली भाषा 'अगं ए आणि अहो ' हे बरंच काही आपल्याला सांगून जाते. आपलं संविधान स्वातंत्र्य, समता, बंधुभाव व सामाजिक न्याय ह्या चार मूल्यावर आधारीत आहे. ही चार मूल्ये जणूकाही एका रथाची चार चाके आहेत. हे रथ व्यवस्थित चालण्यासाठी चारही मूल्याचा वापर आपल्याला कुटुंबात आणि समाजात होणं गरजेचे आहे. जेणेकरून आपलं ध्येय एक समान समाज आणि जग निर्माण करण्याच स्वप्न साकार होण्यासाठी सहाय्यभूत ठरते.

कोणत्याही प्रकारची सामाजिक प्रगती समाजाच्या प्रत्यक्ष सहभागानेच शक्य असते आणि त्या दृष्टीने समान जग निर्माण करण्यासाठी समाजात स्त्री-पुरुष समानता आणणे आवश्यक आहे. मुलीच्या जन्माचं स्वागत व्हायला हवे, मुलीला पराया धन न समजता एक मूल्यवान देणगी समजणे आवश्यक आहे. बहीणभावांना समानतेने घरच्या जबाबदाऱ्या वाटून घ्यायला शिकवलं पाहिजे. त्याचप्रमाणे एकमेकांशी प्रेमाने आणि आदर सन्मानाने वागण्यास शिकवलं पाहिजे.

आज जेव्हा आपण समानतेचा विचार करतो तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकराची क्षणोक्षणी आठवण येते. भारताच्या संविधान प्रास्ताविकेत बाबासाहेब सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना ह्यांचे स्वतंत्र दर्जाची व संधीची समानता प्रदान करण्याबाबत लिहितात. ती समानता आजही समाजात पोहचली आहे का ? हा गहन प्रश्न आहे व ह्यावरून आपल्याला बाबासाहेबांचे विचार अंगीकारण्याची किती गरज आहे हे स्पष्ट होते. ते म्हणायचे "शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा" हा त्याचा संदेश एक समान जग निर्माण करण्यासाठी आत्मसात करणे काळाची गरज आहे व आमच्या ह्या अंकाद्वारे जागृती आणण्याचा आमचा हा प्रयत्न आहे.

**सि. शैला क्रास्टो**
**संचालिका**

**BEST WISHES FROM FRANCISCAN BROTHERS, STAFF AND STUDENTS OF VIDYA VIKASINI SCHOOL (ICSE)**
**GOKHIVARE, FATHERWADI, VASAI (E)**



# स्त्रीच आहे स्त्रीमुक्तीचा आधार

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा जयघोष करणाऱ्या स्वतंत्र भारताला प्रजासत्ताक करणाऱ्या राज्यघटनेचे ७१ वे वर्ष सालाबादप्रमाणे गेल्या २६ जानेवारीला सुरू झाले. आपली राज्यघटना म्हणजे स्वतंत्र भारताचा नवा बावनकशी राष्ट्रग्रंथच आहे जणू! दरवर्षी प्रजासत्ताकच्या प्रगतीचा आढावा घेतला जातो. कोणत्याही देशाचा विकास खऱ्या अर्थाने समजून घ्यायचा असेल तर त्या देशातील स्त्रियांची दशा आणि दिशा समजून घेणे हा हमखास खात्रीचा मार्ग आहे. स्वामी विवेकानंदांनी म्हटलंय की ज्या देशात स्त्रीचा सन्मान केला जात नाही त्या देशाला भवितव्य नाही, त्या समाजाची प्रगती शक्य नाही. जवळपास अर्धी लोकसंख्या असणाऱ्या स्त्रियांची, त्यांच्या स्त्रीशक्तीची दडपणूक करून कोणतेही राष्ट्र प्रगती साधू शकणार नाही.

आज जगात अनेक देशात स्त्रियांना दुय्यम स्थान आहे आणि ही दुःखद बाब एकविसाव्या शतकाचे दोन दशक संपत आले तोवर कायम आहे. अगदी जपान सारख्या विकसीत देशातही स्त्रीचे स्थान दुय्यम आहे; स्त्रियांना एकाच प्रकारच्या कामासाठी पुरुषांएवढे वेतन दिले जात नाही. संधीची समानता अजूनही स्त्रियांच्या बाबतीत साध्य झालेली नाही. स्त्रियांच्या उत्थानाचा मार्ग संधीच्या समानतेतून जातो. भारतात तर स्त्रीसमानतेची स्थिती आजही दुःखद म्हणावी अशी आहे. शिक्षण, उपजत क्षमतेच्या विकासाच्या संधी व त्यातून आर्थिक विकासाच्या संधीच्या समानतेशिवाय खरे स्वातंत्र्य फोल ठरते. केवळ राजकीय स्वातंत्र्य खचीतच पुरेसे नाही. स्त्रियांना या जगात संघर्षाशिवाय काहीही मिळालेले नाही. अनेक ठिकाणी संघर्ष करण्याचीही संधी नाही. अमेरिकेत स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळायला झालेला उशीर पाहता स्त्री-मुक्ती, स्त्री व पुरूष समानता हा न संपणारा प्रवास आहे हेच खरे. भारतासारख्या विषमताग्रस्त व भेदभावाला व्यवस्थात्मक स्वरुप असताना स्त्रियांचा संघर्ष हा मोठा वेदनाप्राय, गुंतगुंतीचा असणे स्वाभाविकच आहे. त्यातही जर स्त्री मागास जातीजमातीतील असेल (आणि विधवा असेल) तर तिच्या भोगाला अंत नाही. आता तर कौसल्या आणि कौसरच्या वेदनाही वेगळ्या समजल्या जाण्याचा धोका आहे. भारतात स्त्री कोणत्याही धर्माची असो, एकूण संघर्ष सारखाच असतो व संधी हिरावल्या जाणे हेच वास्तव असते. जन्माला येताना जे लिंग निसर्ग देतो त्याने आपण नर वा मादी ठरतो. मात्र स्त्री पुरुष भेद ही समाजाने केलेली निर्मिती असते.



देशात शिक्षणाच्या बाबतीत पहिले तर विषमता चटकन लक्षात येते. शिक्षणाच्या गुणवत्तेतील तफावतीमुळे संधींची विषमता वाढते. शालेय शिक्षण हक्काचे झाले असले तरीही ते दर्जेदार, गुणवत्तापूर्ण नसल्याने "शाळा आहे पण शिक्षण नाही; पदवी आहे पण ज्ञानकौशल्ये नाहीत" अशी दारूण स्थिती सर्वत्र दिसते. त्यात इंग्रजी माध्यमाने ज्ञानाची विषमता निर्माण होत आहे. अज्ञानाची विषमता ही आर्थिक विषमतेहून अधिक मारक ठरते. खरेतर इंग्रजी भाषेने देशात ब्रिटीशांच्या आगमनापासून "मुक्तीदायी भाषा" अशी भूमिका बजाविली आहे. ब्रिटीश सत्तेचा सर्वात मोठा फायदा स्त्रियांना झाला असे म्हणता येईल. ब्रिटीशांनी सती प्रथा बंद केली., विधवा विवाहाला, स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन दिले. मुंबई विद्यापीठातून एका पारशी स्त्रीने पदवी मिळवून एक क्रांती घडविली. इंग्रजी शिक्षणाने स्त्रियांच्या मुक्तीला, संधीच्या समानतेला बळ दिले. पण त्याची फळे मुठभरांपर्यंतच सिमीत राहिली. साधनसंपदेच्या मालकी हक्कांपासून स्त्री वंचित राहिली. स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याची संधी नसल्याने स्वविकासाची अनेक दारे बंदच राहिली.

आज जातीपातीतील शिक्षणविषयक मागासलेपणा विचारात घेतानाच स्त्री आणि पुरुष यांच्यातील शिक्षणविषयक वाढत्या दरीकडे दुर्लक्ष होत आहे असे दिसते. विशेषतः आदिवासी जनता शिक्षणाच्या मुळ प्रवाहापासून आजही बऱ्यापैकी वंचित आहे; ज्ञानाची पहाट दूरच आहे. आदिवासी स्त्रियांच्या शिक्षणाची कल्पनाच करू नये. देशभरात मुली शिक्षणात मुलांपेक्षा मागे पडत आहेत. २००१ - २००२ या काळात मुलग्यांच्या तुलनेत तब्बल ५० लाख कमी मुलींना शिक्षणाच्या संधी मिळाल्या. कर्नाटक (४८ मुलांच्या तुलनेत ११

*With Best Compliments From*

# SMILE DENTAL CLINIC





**Dr. Runel R. Pereira**

**B.D.S.(M.U.H.S.)**

**Timings :**

Morning : 9.00 a.m. to 12.30 p.m.

Evening : 5.00 p.m. to 08.00 p.m.

**(Monday To Saturday)**

**Mob.: 9730540251**

**Address : 1st Floor, Image Building, Nirmal Naka, Vasai (W).**

---

# REVIVAL

## PHYSIOTHERAPY CLINIC

**Dr. Rubi R. Pereira**

**M.P.Th. (M.U.H.S.)**

Mob.: 9923823140

**Time : 9.00 am - 12.30 pm**
**5.00 pm - 8.00 pm**

**Besides Noha Medical Store, Nirmal Naka, Vasai (W)**

मुली) व ओडिशासारख्या राज्यात (७४ मुलांच्या तुलनेत ११ मुली ) हे व्यस्त प्रमाण लक्षणीय आहे. केवळ पॉण्डिचेरीमध्ये १३ मुली तर १० मुले शिक्षण घेत आहेत. चंदिगडमध्ये हे प्रमाणे ४० मुली व २७ मुले असे आहे. उच्च शिक्षणाच्या संधी स्त्रियांहून अधिक पुरुषांनाच जास्त मिळतात, हे ओघाने आलेच, करोडो स्त्रियांना शिक्षणाच्या संधी मिळालेल्या नाहीत व मिळतही नाहीत. ग्रामीण व शहरी भागांत याविषयी अधिक विषमतेचे चित्र दिसते. शिक्षणाचा प्रसार होऊनही स्त्री मागेच आहे. शिक्षण म्हणजे खरा आयुर्विमा जो आयुष्यभर पुरतो; व्यक्तीच्या जीवनाच्या प्रतिष्ठेचे रक्षण करतो. मात्र शिक्षणाच्या संधीबाबतच जर विषमता असेल तर स्त्री-पुरुष समानता येणार कशी ? स्त्री जर आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असेल तर ती स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ शकते. जो स्वतःचे पैसे स्वतः कमावू शकत नाही, तो स्वतंत्र नाहीच. त्यातही विविध पर्यावरणविनाशक विकास योजनांमुळे, हवामानबदल व इतर पर्यावरणीय संकटांमुळे शेतजमीन, जंगले गमाविल्याने विकासाचे व पर्यावरणाचे निर्वासित, शरणागत बनल्याने असहायपणे लोक शहरी भागात येतात, तेव्हा त्यांची विविध प्रकारे पिळवणूक होते. त्यातही त्यांच्या स्त्रियांची मोठीच पिळवणूक होते; अगदी शरीरधर्मासाठी आडोसाही उरत नाही. प्रतिकूल निसर्ग हा स्त्रियांचा मोठाच शत्रू होतो. दुष्काळ पडला की स्त्रीला भल्या पहाटे उठून पाण्यासाठी मैलोगणती पायपीट करावी लागते; मुलींना लहान भावंडाची काळजी घेण्यासाठी शाळा सोडवी लागते. जगायचे साधन नाही, शिक्षणाच्या अभावी ज्ञानकौशल्ये नाहीत. ससेहोलपट सुरू होते व त्यात सर्वाधिक पिळवणूक स्त्रीची होते. तिच्या शरीरावर घाला घातला जातो, ती भोगवस्तू ठरते, विविध प्रकारच्या शोषणाला सहजी बळी पडते. मग राज्यघटनेच्या सरनाम्यातील स्वातंत्र्य, समता व समानतेच्या उद्घोष केवळ एक कर्मकांडापुरताच उरतो. "शोषित व वंचित" हेच बहुसंख्य स्त्रियांचे सामाजिक व आर्थिक वास्तव आहे.

मग यावर उपाय काय ? स्त्री सक्षमीकरण हाच उपाय आहे; पण तो साध्य कसा करणार ? अलीकडेच देशाचा वार्षिक अर्थसंकल्प मांडण्यात आला. त्यातही फारसे काही हाती लागले नाही.

यावर एक उपाय असू शकेल तो म्हणजे स्त्रियांनी कोणावरही अगदी पुरुषांवरच काय, मायबाप सरकारवरही अवलंबून ने राहाता स्वतःच्या स्त्री शक्तीचा जागर करीत जागृत होऊन, बंड करून उठावे आणि स्त्रियांनीच एकमेकींच्या सख्या होऊन, एकमेकींशी सख्य साधून एकमेकींची शक्ती संघटीत करून लढावे. स्त्रियांना स्वतःच्या दूरवस्थेविषयी राग यायला हवा आणि या रागातून त्यांनी संघटीत व्हायला हवे व बदलासाठी झटायला हवे.

स्त्रियांनी स्वतःच्या आर्थिक विकासाला हातभार लावणाऱ्या संस्था उभाराव्यात, व्यवस्था निर्माण कराव्यात. व्यवसाय उभे करावेत. प्रत्येक स्त्रीनेच दुसरीसाठी समानतेच्या संधी निर्माण करावी. यात इंटरनेटसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाची, सोशल मिडीया, इ-कॉमर्सची मदत घ्यावी व स्वतःची बाजारपेठ उभी करावी, देशभरात स्त्रियांची म्हणून बाजारपेठ उभी करावी. स्त्रियांनी सुरू केलेल्या लहानमोठ्या उद्योगांना स्त्रीयांनीच आधार द्यावा. त्यांची उत्पादने विकत घेऊन त्यांना विशेष पाठबळ द्यावे. लहानमोठ्या व्यापारपेठांमध्ये अनेक गृहउद्योग करणाऱ्या स्त्रियांची उत्पादने विक्रीला असतात. स्त्रियांनी त्यांना आधार द्यावा. अशा एखाद्या स्त्री उद्योजकाचे उत्पादन आता इंटरनेटच्या माध्यमातून घरबसल्याही विकत घेता येते. अशी एक स्त्री आर्थिक बाबतीत स्वतंत्र होते तेव्हा त्याठिकाणी एक मोठीच ताकद निर्माण होते. जिथे आहात तेथे, जे आहे ते वापरून जमेल ते सुरू करावे. आर्थिक विकासाच्या मिळतील त्या संधी टिपाव्या लागतील, निर्माण कराव्या लागतील. सुरक्षित नोकरी सोडून सक्षम स्त्रियांनी स्वतःच्या व्यवसायाचे स्वप्न पाहावे . यशस्वी स्त्रियांच्या संघर्ष कथा स्त्रियांपर्यंत न्याव्यात. विकासाची, संधीच्या समानतेची एक परिसंस्था उभारावी; कोणाचीही वाट पाहू नये. विविध सरकारी योजनांविषयी स्त्रियांचे प्रबोधन करून त्याचा लाभ घ्यावा. वेळ पडल्यास स्त्रियांनी स्वतःच्या मतदान हक्काच्या राजकीय शक्तीचा वापर करून आवश्यकते बदल राजकीय पक्षांना करायला भाग पाडावे. स्त्रीयांचे राजकीय तसेच विविध स्तरांवर प्रतिनिधीत्व कसे वाढविता येईल ते पाहावे. स्त्रियांनी, स्त्रियांसाठी चालविलेल्या स्त्रियांच्या व्यवस्था उभाराव्यात. सोशल मिडीयाच्या माध्यमातून स्थानिक ते जागतिक स्तरावर महिला हक्कांसाठी लढणाऱ्या स्त्रीवादी संघटनांशी हातमिळवणी करावी. स्वतःच्या स्वत्त्वाचा परिघ वाढवीत लढा व्यापक करीत न्यावा. हातातील मोबाईलचा वापर करीत शिक्षणाच्या (इ-लर्नींग, इत्यादी) संधी निर्माण करून स्त्रियांनी "मोबाईल" व्हावे संघर्षाशिवाय काही मिळत नाही व संघटीत झाल्याखेरीज ताकद निर्माण होत नाही हे सूत्र लक्षात

*With Best Compliments From*



# BP. Allwyn D'silva

St . Pius College Goregaon (E)

ठेवावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित बांधवांना दिलेली संघर्षाची हाक खरेतर स्त्रियांनी स्वीकारावी. बाबासाहेबांनी मोठेच क्रांतीकारी सूत्र दिले आहे जे स्त्रियांसाठी फार मोलाचे आहे. "शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा!" स्त्रियांनी स्त्रियांचे हीत केंद्रस्थानी ठेवून समाजकारण व राजकारण करावे. स्त्रीनेच स्त्रीला मुक्त करावे. स्त्री-पुरुष समानतेआधी स्त्रियांनी स्वतःमध्ये समानता साधावी. उच्चशिक्षीत स्त्रियांनी त्यांच्या ज्ञान कौशल्याचे पाठबळ द्यावे. यातून ताकद निर्माण होईल. शेवटी वाटाघाटी या ताकदीच्या बळावरच होतात. स्त्रियांना दयनीय होऊन याचना करण्याची गरज नाही. त्या स्वतः स्वतःच्या विकासाठी परिसंस्था (इकोसिस्टम) तयार करू शकतात. त्यासाठी त्यांना त्यांच्या विराट आत्मशक्तीची जाणीव व्हायला हवी. स्त्री आता पूर्वीसारखी अबला खचीतच नाही. अर्थात काही कडवट, कठोर, ठाम निर्णय घ्यावे लागतील; अनेकांना तर वैयक्तिक स्तरावर निर्णय घ्यावे लागतील; मात्र त्याची तयारी ठेवावी लागेल. बुद्धीप्रामाण्यवादी होऊन सामाजिक शोषणाला दूर करावे लागेल.

अर्थात हे तेवढे सोपे खचीतच नाही हे स्पष्टच आहे. यासाठी विविध स्तरांवर मोठेच बदल करावे लागतील. सर्वात मोठा बदल हा स्वतःच्या मानसिकतेत, विचारप्रक्रियेत करावा लागेल. एका व्यापक व्हिजनसह एक मोठा सकारात्मक, "ग्रोथ माइंडसेट" विकसित करावा लागेल. आज इंटनेटच्या मदतीने (क्राउडफंडीग) पाचदहा रूपये जमवील, करोडो रूपयांची मदत उभी करता येते. अशी साधने वापरून एकमेकींना आधार देणारी संसाधने उभी करता येतील. "असाध्य ते साध्य, करीता सायास, कारण अभ्यास" हे तुकोबांचे शब्द मार्गदर्शक ठरतील.

"शोषित व वंचित" हे वास्तव असताना "सक्षमतेतून समानता" हे सूत्र ठेवून स्वतःच्या क्षमतांचा सातत्याने विकास करीत स्त्रिया संधीची समानता लवकरच मोठा पल्ला गाठू शकतील. हा केवळ विश्वासच नसून स्त्रियांचा आत्मविश्वास व्हायला हवा. मग तुम्ही आलात तर तुमच्यासह नाहीतर तुमच्याशिवाय" असा ठाम धोरण असायला हवे. यासाठी स्त्रियांची स्वतःची एकात्मता गरजेची आहे. आज अनेक स्तरांवर स्त्रिया लढत आहेत, झगडत आहेत आणि विजयीही होत आहेत. रात्र खूप मोठी होती पण स्त्रियांच्या समानतेची पहाट उगवेल यात वाद नाही. शेवटी स्त्रियांच्या अभ्युदयातच देशाचा अभ्युदय सामावलेला आहे. यासाठी प्रत्येक स्त्रिला दुसऱ्या स्त्रीच्या समानतेसाठी खंबीरपणे उभे रहावे लागेल. स्त्रीच आहे स्त्रीमुक्तीचा आधार!

प्रकाश आल्मेडा

## एक संधी समानतेची



गरज आहे तिला एका समान संधीची
जन्माआधी तरी कधीही न मरण्याची
लहानपणी खेळातील बॉल आणि बॅटची
गरज आहे तिला एका समान संधीची

नको नुसती बाहुली, भांडी आणि रॅकची
जाते आणि वरवंटा नुसती रेलचेल जेवणाची
धडपड तिने करायची सुगरण चांगली बनण्याची
गरज आहे तिला एका समान संधीची

झाडू, लादी, कपडे तिनेच धूत बसायचे
उंच झेप घेण्यासाठी तिने कधी शिकायचे
नोकरी तिने करून सुद्धा जबाबदारी घरची
गरज आहे तिला एका समान संधीची

मुभा नाही तिला जोडीदार निवडायची
मुलानेही नेहमी सुंदर मुलगी पहायची
सौंदर्य , शिक्षण, नोकरी घर तिची धावपळ नेहमीचीच
गरज आहे तिला एका समान संधीची

लग्नानंतर तिनेच सासरी का जायचे ?
पुरुषानेही थोडे वेगळे अनुभव घ्यायचे
नात्याची ओझी तिनेच का वाहायची ?
गरज आहे तिला एका समान संधीची

निवृत्तीनंतरही पुन्हा घर पाहायचे
पुरुषाने मात्र आपले म्हातारपण जपायचे
तिने स्वतःसाठी कधी जागा पहायची
गरज आहे तिला एका समान संधीची

**ॲड. विद्या पाटील**
**सख्य**

*With Best Compliments From*



# NOEL LAWRENCE FERNANDES

Preet, At.Mardes Fernat Ali,

Po. Nirmal, Tal. Vasai

# WOMEN ALSO LOVE TO RIDE

Something that inspired me to write on the theme 'Each for Equal' was after reading about women across the world who always wanted to ride motorcycles but had to start it at a later stage as they were prey to societal norms and gender stereotyping. I was fascinated by reading their stories where some took the risk of travelling alone across different Countries or States, some saved up to purchase a motorcycle of their own which taught me that it doesn't matter what others think about you and gave a feeling of freedom.

Women are always pressurized when they say that they want to learn riding, they are constantly told they can't be trusted on roads which in turn discourages them to ride motorcycles. Studies show that very few Indian women are wanting to ride bikes but thanks to those Indian Women who are setting a benchmark through their motorcycle journeys and biker clubs that have come into force especially for women so that they can learn how to ride bikes and be a member for a cause.

From my personal experience I would say that I learned to ride Royal Enfield Bullet when I was in 10th grade, the only thing I knew was to balance a bicycle before I sat on Bullet. My father motivated and took out some time to teach me how to ride it and was also willing to share his dear vehicle with me. I took seven days to learn and I still remember the day when my father was so proud seeing me ride it. I'm fond of Harley Davidson bikes and also got an opportunity to ride it in Bangalore. I must say it is not just about learning how to ride motorcycles but it is about identifying your strengths and limits and I would never get to experience this if my father wouldn't have initiated it in the first place.



Whenever I would ask my female friends or would encourage them to ride bikes they would end up saying that they are either short or underweight. I won't accept this because when I was in 10th grade I was half of what I am now and I have also seen females irrespective of their height and weight riding motorcycles.

Reading content related to women riding motorcycles showed the picture that India is still a minority in this case. Instead of blaming women that they aren't capable women should be encouraged to ride motorcycles as they will experience how powerful and free they are.

One of the reason most women don't undertake this is because they have experienced eyes judging them when they are riding. Riding motorcycle has nothing to do with masculinity, a woman should feel that she isn't too weak or feminine but is proficient, fun-loving and can always accomplish something new.

Gender has always been close to my heart and I would like to thank SAKHYA for giving me an opportunity to express my thoughts unfiltered on the same. As a student social worker placed in this organization everyday is a learning and I have become more confident as a woman as I have faced quite a lot of gender norms structured by the society in various walks of my life. I am of the belief that no matter how diverse the gender of a person is they shouldn't be limited to any role but should always be seen as a human first and treated equally.

Thank you,

**Ann Mary Jacob**

**Student From Nirmala Niketan Social Work College**

*With Best Compliments From*



# Smita Ramesh Crasto

# समान जग, सक्षम जग!

'समान जग, सक्षम जग' ह्या वर्षीच्या जागतिक महिला दिनानिमित्त ठरविण्यात आलेली ही संकल्पना! मला लगेचच पटली! खरचं व्यक्ति व्यक्तिमध्ये सर्व पातळीवर समानता असेल तर नक्कीच प्रत्येक व्यक्ती सक्षम बनू शकते. यासाठीच तर आपल्या राज्यघटनेमध्ये समानतेच्या तत्त्वाला खूप महत्त्व दिलेले आहे. आपल्या राज्यघटनेमध्ये मूलभूत हक्क अंतर्भूत केलेले आहेत. त्यामध्ये समानतेच्या मूल्याचा पुरस्कार करण्यात आला आहे. आर्टिकल १४ नुसार रंग, वंश, जात, धर्म, लिंग ई. च्या आधारे कायद्यापुढे कोणत्याही प्रकारचा भेदभाव करता येत नाही.

अर्थात कायद्यात जरी समानतेच्या मुद्याच्या अंगीकार केलेला असला तरी भारतीय समाजात हे मूल्य रुजवण्यासाठी समाजात असलेल्या भेदभावाला दूर केले पाहिजे, असमानता दूर केली पाहिजे आणि हे करण्यासाठी सरकारने देखील आवश्यक ती पावले उचलली पाहिजेत ही जाणीव राज्यकर्त्यांना होती त्यामुळेच आर्टिकल १५(३)द्वारे समाजातील दुर्बल घटकांसाठी कायदे बनवण्याचा अधिकार सरकारला देण्यात आलेला आहे. कायद्यात विशेष तरतुदी करून समाजातील दुर्बल घटकांना सक्षम घटकांच्या बरोबरीने आणण्याच्या उद्देशाने शासनाकडून कितीतरी विशेष कायदे पारीत करण्यात आले आहेत.

आपल्या समाजात पारंपारिकरित्या स्त्रियांचे स्थान देखील दुय्यमच आहे. त्यामुळे त्यांना विविध प्रकारच्या भेदभावाला सामोरे जावे लागते. म्हणूनच स्त्रियांना अधिकार देणारे, जास्त सुविधा, आरक्षण देणारे कायदे पारित करण्यात आले आहेत किंवा आधीच्या कायद्यात सुधारणा करण्यात आल्या आहेत. यामुळे समानतेकडे आणि अर्थातच सक्षमीकरणाकडे स्त्रियांची वाटचाल होईल, हे अपेक्षित आहे. मात्र खरोखर असे होईल का हा खरा प्रश्न आहे.

विशेष कायदे पारित जरी झाले तरी त्याचा उपयोग तेव्हाच आहे जेव्हा त्याची अंमलबजावणी परिणामकारकरित्या केली जाते, आणि इथेच खरी मेख आहे कारण कायद्याची अंमलबजावणी करणं ज्यांच्या हातात आहे त्या सर्व यंत्रणांची, लोकांची आणि समाजाची



मानसिकता मात्र स्त्रीला दुय्यम लेखणारी, पुरुषप्रधान अशीच आहे. त्यामुळे कायदे स्त्रियांच्या बाजूने होऊनही प्रत्यक्ष न्याय मात्र स्त्रीच्या बाजूने होताना दिसत नाही. वानगीदाखल अशी कित्येक उदाहरणे देता येतील जिथे कायदा एक सांगतो आणि वस्तुस्थिती मात्र वेगळीच आहे.

आपल्याकडे समान वेतन कायदा लागू आहे. ज्यानुसार स्त्रिया व पुरुष याना एका कामासाठी समान वेतन मिळाले पाहिजे. प्रत्यक्षात मात्र अनेक क्षेत्रांमध्ये स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी वेतन दिले जाते. तसेच महिलांसाठी उपलब्ध असलेल्या आर्थिक संधी देखील पुरुषापेक्षा कमीच आहेत. जागतिक आर्थिक मंचाने लैंगिक समानता अहवाल जाहीर केला आहे त्यात भारत १४९ स्थानावर आहे. वारसा हक्कांच्या सुधारित कायद्यानुसार वडिलांच्या संपत्तिमध्ये मुलींना सुद्धा हक्क दिलेला आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र अस दिसतं की खरोखर एखाद्या मुलीने हिस्सा मागितला तर तिला नावं ठेवली जातात. तिचा हिस्सा तिने भावाला स्वेच्छेने देऊन टाकावा अशी अपेक्षा असते कित्येक घरात अजूनही मुलीला तिच्या लग्नात भरपूर सोनंनाणं दिलेलं आहे, तोच तिचा हिस्सा असं अगदी ठामपणे सांगितलं जातं. परंतु मुलाला आणि जावयाला लग्नात हौसेने भेटी दिल्या जातात तेव्हा मात्र ते गृहीत धरलं जात नाही. तसेच सासरकडील लोकांकडून मुलीला जे सोनंनाणं दिलं जातं, ते खरं तर तिचं स्त्री धन... तिला मिळालेल्या भेटी, पण त्यावर मात्र तिचा हक्क मान्य होत नाही. त्याचबरोबर घरावर नवरा बायको दोघांचा मालकी हक्क असला तरी घर मालक म्हणून नवऱ्याकडेच पाहिले जाते. भांडण झाल्यास बऱ्याचदा बायको वरच घर सोडून जाण्याची वेळ येते.

आपल्याकडे कायद्याने सर्वांना व्यवसायाच्या समान संधी दिलेल्या आहेत. प्रत्यक्षात मात्र आजही व्यवसायामध्ये लिंगभाव आधारित व्यवसायाची निवड प्रामुख्याने दिसून येते त्यामुळेच आपल्याकडे कितीतरी व्यवसायात स्त्रियांचे प्रमाण नगण्य होते. यावर मात करण्यासाठी निरनिराळ्या व्यवसायात

*With Best Compliments From*



# Ramesh Anthony Crasto

स्त्रियांना आरक्षण देण्यात आले आहे. या आरक्षणाच्या माध्यमातून समानतेच्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकले गेले आहे, कारण बंधनकारक असल्याने का होईना विविध क्षेत्रात स्त्रियांची भरती करावी लागत आहे.

आज आपल्या देशात सर्वांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे केलेले आहे. परंतु तरीही शाळा गळतीचे प्रमाण लक्षात घेण्याजोगे आहे आणि त्यातही मुलींमध्ये शाळा गळतीचे प्रमाण जास्त आहे. याचे कारण म्हणजे अजुनही चूल आणि मूल हे प्रामुख्याने महिलांचेच कार्यक्षेत्र मानले गेले आहे, त्यामुळे घरकाम करणे, लहान भावंडांना सांभाळणे यासाठी मुलींना शाळा सोडावी लागते. त्यामुळेच आज जागतिक पातळीवर शिक्षणातील लैंगिक समानतेमध्ये भारत ११९व्या स्थानावर आहे.

लिंगाधारित हिंसा सहन करणाऱ्या स्त्रियांना साहाय्य करण्यासाठी देखील घरेलू हिंसाचार विरोधी कायदा, कामाच्या ठिकाणी होणारी लैंगिक छळवणूक तक्रार निवारण कायदा आदि विशेष कायदे करण्यात आले आहेत. यामुळे महिलांना अत्याचाराविरुद्ध दाद मागणे सुलक्ष झाले आहे. परंतु येथेही जेव्हा कायद्याच्या अंमलबजावणीचा प्रश्न येतो तेव्हा न्यायालयापासून पोलिसांपर्यंत सगळ्यांच्या पुरुष प्रधान मानसिकतेचा सामना स्त्रियांना करायला लागतो. विशेष कायद्यांना अनुसरून "आता काय बायकांच्या हातात कोलीतच सापडलय, आता त्या उठसूठ पुरुषांना वेठीला धरतील" अशी स्वरुपाची टीका केली जाते. प्रत्यक्षात मात्र घरगुती हिंसा ही 'घरातली खाजगी बाब आणि 'लैंगिक हिंसा म्हणजे स्वत:च्या आणि कुटुंबाच्या इज्जतीवर घाला' असे समजून स्त्री याविषयी उघडपणे बोलणे टाळते. याचं कारण म्हणजे अजूनही स्त्रियांवर होणाऱ्या हिंसेसाठी त्यानाच जबाबदार धरण्याकडे आपला कल आहे.

यामुळे एकंदरीतच आपल्याला असे दिसते की आपला समाज हा लिंगभाव आधारित भेदभावातून आणि पुरुषी मानसिकतेतून मुक्त झालेला नाही. त्यामुळे समानतेचे तत्त्व हे आपलं अद्याप पूर्ण न झालेलं उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी समाजाची मानसिकता बदलण्याची गरज आहे. समाजाची मानसिकता बदलणे ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे. मात्र विशेष कायदे करून समाजाला प्रथम बदल स्वीकारायला भाग पाडणं उपयुक्त ठरू शकतं. उदा ... महिलांसाठी राजकीय क्षेत्रात आरक्षण! एकदा नियमामुळे का होईना महिलांना त्या क्षेत्रात बघण्याची सवय झाली की मग त्यांना त्या क्षेत्रात स्वीकारण्याचे प्रमाण वाढते आणि सहाजिकच समानतेच्या दिशेने एक पाऊल पुढे जाते, हे आपल्याला दिसून आले आहे.

त्याचबरोबर समानतेसाठी संघर्ष करणाऱ्या लढ्याला आणि त्यांच्या मागण्यांना विशेष कायदे पारित झाल्यामुळे एक वैधता येत म्हणजेच थोडक्यात सांगायचं तर स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी समानता असणं आवश्यक आहे. समानता येण्यासाठी समाजाच्या मानसिकतेत बदल होण्याची गरज आहे. ह्या बदलला बळकटी येण्यासाठी कायद्याचे अधिष्ठान आवश्यक आहे. तसं झालं तर स्त्रियांचे सक्षमीकरण दूर नाही.

**मृदुला सावंत**


*With best compliments from*

1) Dolcy Falco
2) Othniel. D. Rebello
3) Celine V Falco
4) Pereira Elevators
5) Oive Marble and Tiles
6) Prakash A. Patil
7) Peter Fernandes & Family
8) Lawrence Louis D'souza
9) Sr. Maria Lewis (Infirmary Lncharge)
10) Chaya Victor Rosario
11) St. Augastin H. S.
12) Jonisha Sunil Fernandes
13) Peter Paul Almeida
14) Kalptaru Credit Co-operative
15) Valencia Vincent D'mello
16) Luzan Peter D'souza

# MANUAL PRINT
## OFFSET PRINTERS

.SMARNIKA. .ANNUAL REPORT PRINTING.
.ALL TYPES OF PLAIN AND PRINTED SCHOOL STATIONERY. .NOTE BOOKS.
.SCHOOL CALENDER. .DATE CALENDER.
.CAKE BOXES. .CORRUGATED PIZZA BOXES.
.PAPER BAGS AND PAPER POUCHES.



email: manualprint@yahoo.in
contact: Manual Dias 9765874493

Factory & Office address: Unit No.9, Bldg. No.2, Patel Industrial Estate, Behind Range Office, Gokhivare, Vasai(E)



# Two Brown Girls
a design studio
for customised garments and accesories.





.wedding gowns.
.cocktail dresses.
.evening gowns.
.casual dresses.
.sarees. .kurtis.
.jumpsuits.

address: Bangli naka, sandor
contact: 8329212419



# JESUS
CONSTRUCTION CO.
Building Contractor
& Building Material Suppliers

## *Prop. Mr. Joseph Lopes*

**9326472715 / 9850257983**

At.Nanbhat (Sitarbhar),
Tal. Vasai, Dist. Palghar,
Virar - Nallasopara (W) 403 203.

# एक समान जग

गणपतराव दर्यानी थोरातांनी महात्मा ज्योतिबा फुलेंना प्रश्न विचारला की, "सत्यवर्तनी कोण?" उत्तर देताना ज्योतिबा म्हणाले, "माणसाच्या दोन जाती म्हणजे स्त्री आणि पुरुष आणि या घटकांना जेथे समान वागणूक दिली जाते तेथे सत्यवर्तन असते सत्य म्हणजे ईश्वर सुंदर विचारांची जोपासना त्याठिकाणी होते." ज्या वातावरणात सत्याची पूजा केली जाते त्या वातावरणात मतभेदाला, वाद विवादाला भांडणतंट्याना मुभा नसते. प्रश्न, समस्या तेथे उद्भवत नाहीत. निकोप प्रवृत्तीची माणसं घडत जातात. संवादाला अनुकूल वातावरण निर्माण होत असते. आणि तिथेच माणसातल्या माणुसकीचा जन्म होत असतो.

आज वर्तमानपत्राचे पान उघडले, मोबाईलवर बोट ठेवले, रेडिओ ऑन केला, टी.व्ही चालू केला अगर अन्य प्रसारमाध्यमाकडे पाहिले तर आपल्याला ,स्त्रियांवर होणारा अन्याय, अत्याचार, बलात्कार, खून दरोडे, मारामाऱ्या फसवणूक, लूटमार इ. तसेच राजकीय क्षेत्रातल्या कुरघोड्या सांस्कृतिक, साहित्यिक व अन्य क्षेत्रात प्रसिद्धीसाठी हपापलेली माणसं, पुरस्कारांसाठी लाळघोटेपणा करणारे कलावंत, स्वतःच्या शेकडो पिढ्या धनसंपन्न करण्यासाठी गाव, समाज देश विकणारा मागेपुढे न पाहणारे राजकारणी, आईवडिलांची संपत्ती हडप करण्यासाठी प्रसंगी त्यांच्या गळ्याचा घोट घेणारी मुलं अज्ञानाचा दारिद्र्यांचा गरिबीचा फायदा उठवून स्वतःला सुसंस्कृत समजणारा सुशिक्षित वर्ग या सगळ्या घटनेकडे पाहताना तुकारामांच्या म्हणण्याप्रमाणे,

।।रात्रंदिन आम्हां युद्धाचां प्रसंग।।

अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. सगळीकडे समानता ही संकल्पना या अंदाधुंदीच्या नव्हे, वैचारिक प्रदूषणाच्या काळामध्ये आमच्या आचार-विचार कृतीतून साध्य करता येईल का?

समाजात एकसमानता निर्माण करण्यासाठी लढा देणाऱ्या ताराबाई शिंदे आठवतात. स्त्री - 
शिक्षणासाठी आयुष्य वेचणाऱ्या सावित्रीबाई व महात्मा फुले आठवतात आपल्या दरबारी पकडून आणलेल्या कल्याणच्या सुभेदारीच्या सूनेला साडी चोळी भेट देऊन तिच्या घरी सन्मानाने पोहचविणारे शिवाजी महाराज आठवतात. व्यभिचारी स्त्रीला क्षमा करून न्याय देणारे ख्रिस्ती आठवतात. बायकांना परिधान करण्यासाठी कपडे नाहीत म्हणून आयुष्यभर कमीत कमी कपडे घालणारे गांधी आठवतात. युगोस्लोव्हियाच्या रहिवासी परंतु भारतीय कृष्ठरोग्यांची सेवा करून त्यांचे अश्रू पुसणाऱ्या धर्म, जात वंश, देश, वेश, भाषा यांच्या पलीकडे जाऊन सेवा करणाऱ्या मदर तेरेसा आठवतात. कृष्ठरोग्यांना जवळ करून आनंदवनची निर्मिती करणाऱ्या बाबा आमटेची आठवण होते. असे कितीतरी महामानव होऊन गेले की ज्यांनी असमानतेचे विष पचवून समानता आणण्यासाठी आपले आयुष्य वेचले आणि आदर्श समाज निर्मितीचे बीज पेरले.

समानतेचे वातावरण निर्माण करण्यासाठी एक माणूस म्हणून माझे कर्तव्य काय? या प्रश्नावर विचार करताना माझ्या कुटुंबापासून मला सुरूवात करावी लागेल. आपल्या कुटुंबात जन्माला आलेल्या मुलीचे स्वागत करावे, घरातल्या कुठलाही निर्णय स्त्री-पुरुषांच्या संगनमताने घेतला जावा. श्रेष्ठ-कनिष्ठ, शिक्षित -अशिक्षित, श्रीमंत-गरीब असा भेदाभेद दूर सारावा तरच एकसमान कुटुंब पर्यायाने गाव, समाज, राष्ट्र व जगाची निर्मिती होऊ शकते. माणूस म्हणून माझ्या कर्मभूमीत, माझ्या अवती-भोवती असलेल्या माणसांशी माझं वागणं कसं आहे? याच आत्मपरीक्षण करावं लागेल. माझ्या हातात असलेल्या अधिकाराचा, सत्तेचा वापर मी कसा करतो? तळागाळापासून उच्चभ्रू माणसांपर्यंत माझे नातेसंबंध कसे आहेत? माझ्या शेजारी असलेल्या गरजू पीडित व्यक्तीविषयीची वेदना माझ्या अतंर्मनाला टोचते का? इतरांच्या अडचणीत, संकटात,

*With Best Compliments From*





# हार्दिक शुभेच्छा!



## फ्रान्सिस बावतीस फर्नांडीस

**माजी सरपंच, मर्देस**

**उपाध्यक्ष वसई इंडस्ट्रीयल असोशिएशन**
**वसई (पूर्व)**


*With Best Compliments From*

ADVOCATE

**Mob.: 8698118291**

## Mrs. Geeta Fernandes

**B.A.L.L.B**

## ADVOCATE, HIGH COURT

**Office At. G/02, Ground Floor, Rupa Apartment,**
**Near Patil Hospital, S.T. Depo Road,**
**Near Panchmukhi Mandir, Nallasopara (W).**
**Tal. Vasai Dist Palghar, Pin- 401 203 ,**
**Email : femadesgeeta@ymail.com**


**श्रद्धांजली!**

स्व. विद्या बाळ



३० जानेवारी २०२० रोजी वयाच्या ८३ व्या वर्षी विद्या बाळ यांचे निधन झाले. आपल्या झुजांर नेतृत्त्वाने स्त्री मुक्तीचे कार्य केले. स्त्रियांकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन जगाला दिला. त्यांनी सुरू केलेल्या चळवळी समाजात सदैव जागृतीची ज्योत तेवत ठेवतील व त्यांचे कार्य अनेकांना प्रेरणादायी ठरेल.

सख्य परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

अस्वस्थेत मला मदत करावीशी वाटते का? की त्यांच्या संकटाचे मी जाहीर प्रदर्शन करते ? इतरांच्या जखमांवर फुंकर घालून त्यांचे दुःख कमी करणारी मानसिकता समाजात समानता निर्माण करू शकते. या सगळ्यासाठी अंतरीचा ज्ञानदिवा सतत तेवत ठेवावा लागेल. जीवनाच्या सर्व विकृतीना मूठमाती द्यावी लागेल. माझ्यासारख्या हाड-मांसाचा लालरक्ताचा भावभावनांचा समोरचा माणूस आहे त्याचे दुःख हे माझे दुःख आहे. त्याचे प्रश्न हे माझे प्रश्न आहेत, असा ध्यास मला लागला आणि त्या दृष्टीने कृती करीत गेलो तर संत तुकारामाच्या म्हणण्याप्रमाणे ,

आनंदाचे डोही आनंद तरंग

अशी अवस्था निर्माण होईल, अब्दुल कलामांच्या म्हणण्यानुसार-

Life begins with our cry
and life ends with others cry
fill this gap with as much laughas possible

रविंद्रनाथ टागोर म्हणतात त्याप्रमाणे सूर्याएवढे प्रकाश नव्हे, पण पणती एवढा प्रकाश देण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला तर अंधारात लख्ख प्रकाश पडेल आणि प्रकाशाच्या पावसात आम्ही न्हाऊन निघू.

**शैला घोन्सालविस**

---

## समाज कार्य शिक्षण घेणाऱ्या S.N.D.T. कॉलेजच्या विद्यार्थीनीचे अनुभव

**दर्शना सुर्यवंशी**



'सख्य' महिला मार्गदर्शन संस्थेतील माझा अनुभव हा अतिशय छान होता. NGO बद्दल सर्व माहिती फक्त ऐकली व पाहिली होती. परंतु सख्य संस्थेत आल्यावर कशाप्रकारे संस्थेत काम केले जाते ते शिकायला मिळाले. सख्य संस्थेत आल्यावर कशाप्रकारे सख्य महिलांना सक्षम बनविण्यासाठी वस्ती पातळीवर कार्य करते कशाप्रकारे सख्य घरगुती हिंसाचाऱ्याला. बळी पडलेल्या महिलांना मार्गदर्शन करून त्यांचा आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न करते व त्यांना त्या परिस्थितीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न करते ते शिकायला मिळाले. सख्य संस्था कशाप्रकारे कॅम्पियन, नेटवर्किंग आणि विविध प्रकारचे कार्यक्रम राबवून समाजात समानता व समान न्याय असणारा तसेच महिलांना मानवी प्रतिष्ठेने जगू देणारा समाज निर्माण करण्यासाठी कशाप्रकारे सामाजिक कार्य करते ते शिकायला मिळाले. तसेच सर्वात महत्त्वाची गोष्ट सामाजिक कार्य करीत असताना आपले वैयक्तित आयुष्य आणि आपल्या वैयक्तित बाबींचा संबंध आपल्या सामाजिक कार्यात न येऊ देता कशाप्रकारे आपली सामाजिक जबाबदारी पार पाडावी ही महत्त्वाची गोष्ट शिकायला मिळाली.

---

## समाज कार्य शिक्षण घेणाऱ्या S.N.D.T. कॉलेजच्या विद्यार्थीनीचे अनुभव

**सुमेधा जाधव**



'सख्य महिला मार्गदर्शन केंद्र या संस्थेतील माझा अनुभव हा अविस्मरणीय आहे.


सख्य संस्थेकडून खूप छोट्या छोट्या गोष्टींमधून मला खूप काही शिकायला मिळालं. यासाठी मी सख्य संस्थेचे व माझ्या एस. एन.डी.टी. महिला विद्यापीठाचे आभार मानते की, त्यांनी मला सख्य संस्थेसोबत काम करण्याची संधी दिली.

खरं सांगायच तर मला रुग्नालयाची खूप भिती वाटायची परंतु सख्य संस्था तेथे काम करत आहे. रुग्णालयात येणारे रूग्ण हे घरगुती हिंसा यांनी जखडलेले आहेत, त्यामुळे लोकांचे घरगुती प्रश्न, त्यांच्या समस्या त्यांचे दुःख जवळून पाहता आले व रूग्णालयाची माझ्या मनात असणारी भिती दूर झाली.

लोकांचे विविध प्रश्न, त्यांच्या समस्यांवर कशाप्रकारे त्यांना मार्गदर्शन करने गरजेचे आहे हे मी सख्या संस्थेकडून शिकले त्याचबरोबर महिला व बालकांसाठी त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी घेतले जाणारे संस्थेमार्फत कार्यक्रम हे सुद्धा खूप सारे अनुभव देऊन गेले.

समुदायात काम करत असताना समुदायाकडून मला मिळालेला चांगला -वाईट दोन्ही स्वरूपाचा प्रतिसाद हा माझ्या आयुष्यात माझा अनुभव म्हणून नेहमीच माझ्या सोबत असणार आहे.

*With Best Compliments From*



# *Kaitan Francis Fernandes*

*With Best Compliments From*



# S. ENATS

**Software & App Development**

(E & A Technology Services LLP.)

D 06, Chandresh palace, St Road Nallasopara (W)
Palghar, Maharashtra 401203.
Mob.: 9325888529

# बेथेल फार्महाऊस






**आमच्याकडे देशी कोंबड्या व पिल्लू योग्यभावात मिळतील.**

**पत्ता : ईश्वरदान मावंडा, माळी-आळी
बागेश्री पेट्रोलपंपजवळ, निर्मळ**

**मो.: ९०४९२४७६७५**

*With Best Compliments From*



## Mr & Mrs. Mabel Rupesh Rozario

**Tejomaya Wagholi Wageshwari Road**

# त्रैमासिक अहवाल

## वस्ती पातळीवरील कार्य

☞ **सहचारी कटिबद्धता :**

गास डोंगरीतील विवाहीत जोडप्यांसाठी कपल बॅन्डिंग कार्यशाळा विविध खेळ, चित्रफीत आणि डान्सच्या माध्यमातून निर्मला निकेतनच्या विद्यार्थ्यांमार्फत राबविण्यात आली आणि वस्तीतील लोकांकडून या कार्यशाळेस सकारात्मक प्रतिसाद मिळाला.



☞ **सावित्रीबाई फुले जयंती उत्सव :-**

स्त्री शिक्षणाच्या पुरस्कर्त्या, प्रथम महिला मुख्याध्यापिका सावित्रीबाई फुले यांचा जयंती उत्सव गास डोंगरीतील महिलांनी अतिशय उत्साहात साजरा केला. स्त्री शिक्षण व सावित्री बाईच्या जीवनावर प्रकाशझोत टाकत मुलींसाठी कौशल्यवृद्धी प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरूवात रांगोळी प्रशिक्षणाने केली.

## प्रशिक्षण कार्यक्रम

☞ लिंगभेदावर आधारित महिलांवर होणारी हिंसा आणि आरोग्यसेवा पुरविणाऱ्या कर्मचाऱ्यांची भूमिका या विषयांवर रूग्णालयातील परिचारिका, वॉर्डबॉइज, आयाबाई, डॉक्टर्स यांच्या सोबत वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत असलेला सर्वोदय वसाहत बाल-माता संगोपन केंद्र, सातीवली माता बाल संगोपन केंद्र पारनाका रूग्णालय, विजयनगर रूग्णालय येथे कार्यशाळा घेण्यात आली.

☞ लिंग भेदावर आधारित महिलांवर होणारी हिंसा आणि पोलिसांची भूमिका या विषयावर वालीव, वसई व पोलिस स्टेशनमधील पोलिस कर्मचारी वर्गासोबत, गटकार्य, चर्चा चित्रफित व PPT सादरीकरणामार्फत कार्यशाळा राबविण्यात आली.





☞ **पारिचारिका कायदे :-**

ठाणे सिव्हिल हॉस्पिटलमधील परिचारीका तसेच परिचारिका विद्यार्थीनी सोबत परिचारिका कायदे याविषयावर मार्गदर्शन करण्यात आले.



☞ **विधी कार्यशाळा :**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प वसई आणि सख्यच्या संयुक्त माध्यमाने महिला संदर्भातील कायद्यांचे

मार्गदर्शनपर कार्यशाळा टिवरी व शिवणसई येथे घेण्यात आली. ज्यामध्ये घरगुती हिंसा प्रतिबंधक कायदा, छोडछाड संदर्भातील कायदा तसेच 498-A, 376 व कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारी लैंगिक हिंसा प्रतिबंध कायद्यासोबत NC, FIR व OFIR सोबत पोलिस स्टेशन संदर्भातील महिलांचे अधिकार याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

☞ लिंगभेदावर आधारित महिला हिंसा आणि महिलांवरील मुद्याबाबत गोरेगाव येथील निर्मला निकेतन विस्तारीत शाखेतील ज्येष्ठ नागरिकांच्या विद्यार्थी गटासोबत चर्चासत्र घेण्यात आले.

☞ **सोशल मिडिया आणि त्याचा महिलांवर होणारा परिणाम:-** सायबर गुन्हांची वाढती सख्या लक्षात घेऊन SHARE NGO च्या वस्तीतील नेतृत्वगुण असलेल्या. महिलांकरीता सांताक्रूझ व नालासोपारा येथे कार्यशाळा राबविण्यात आली तसेच गिरीज येथील सरकारी हॉस्टेलमधील मुली तसेच पारोळ विभागातील अंगणवाडी सेविका, T.B. कॉलेज मधील ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले, सायबर क्राइम म्हणजे काय, त्याचे प्रकार, प्रतिबंधात्मक उपाय, महिलांना असलेला धोका व तक्रार कशी करावी. इ. याबाबत चर्चा करण्यात आली.




☞ **चांगला स्पर्श व वाईट स्पर्श :-**

चांगला स्पर्श व वाईट स्पर्श यातील फरक, तो कसा ओळखावा व सुरक्षा क्रमांक याबाबत सेंट पिटर स्कूल अर्नाळा, ठाणे येथील डेकेअर सेंटर तसेच गास डोंगरी मधील मुलांसोबत चर्चासत्र घेण्यात आले.

☞ **वयात येताना :**

एकात्मिक सेवा योजना प्रकल्प वसई व सख्यच्या विद्यमाने बापुजी बाबाजी स्मारक विद्या मंदिर चांदिप येथे वयात येताना होणारे शारीरिक, भावनिक बदल, पौंगडावस्था, मासिक पाळी, पौगंडावस्थेमुळे येणाऱ्या समस्यांना कसे सामोर जावे याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.



☞ **आरोग्य प्रशिक्षण :** संत जोसेफ कॉलेज, सत्पाळा येथील विद्यार्थीकरीता आरोग्याचे महत्त्व सांगण्यात आले.



☞ कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारी लैंगिक हिंसा प्रतिबंधात्मक अधिनियमानुसार तक्रार निवारण समितीच्या सभासदांकरीता Manoj Expo Internation Company मध्ये कर्मचाऱ्यांची भूमिका आणि लिंगभेदावर आधारीत कामाच्या ठिकाणी होणारी महिलां हिंसा याविषयांवर कार्यशाळा घेण्यात आली तसेच रिझर्व बँक ऑफ इंडिया, Miles education, अंधेरी तसेच India fasion Pvt. Ltd कंपनी येथे मिंटीग घेण्यात आली. Calypso कंपनी पुण्यात मिटींग तर Calypso



कंपनी पुणे येथे कार्यशाळा घेण्यात आली.

## विशेष कार्यक्रम

☞ **मकरसंक्रांत सोहळा आणि स्पोर्ट डे**

कामाच्या रगाड्यात असणाऱ्या महिलांनी एक दिवस खेळाच्या माध्यमातून भरपूर आनंद लूटला. वर्षभराचा ताण त्या तीन-चार तासात पूर्णपणे विसरून जाऊन आपल्या नेतृत्वगुणाचा व कलागुणांची सांगड घालत प्रत्येक महिला आपला गट जिंकण्यासाठी मेहनत करत होती, गास डोंगरी, चौबारे, गिरीज तसेच ठाण्यातील मनोरमा नगर मधील महिलांकरीता एक दिवस गटस्पर्धेचे आयोजन केले, स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व महिलांना बक्षीसे वाटप करण्यात आले आणि मकर संक्रात साजरी करून आनंद द्विगुणित करण्यात आला.





☞ **दिवाळी मेळावा**

भदाणे पाडा, गासडोंगरी, निर्मळ मधील महिलांकरीता विविध खेळ, गाणी, रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून दिवाळी मेळावा आयोजित केला, यामध्ये महिलांनी उत्सफूर्तपणे सहभाग दर्शविला.

☞ **आनंद मेळावा आणि बालदिन :-** ठाण्यातील सिद्धेश्वरनगर, गौतमनगर, सुळेश्वर पाडा, गासडोंगरी, भदाणे पाडा तसेच मांडवी मधील मुलांसोबत बालदिन साजरा करण्यात आला तसेच नवीन वर्षाच्या सुरूवातीला खेळ, गाणी आणि डान्स आणि मौजमजेसह आनंद मेळावा साजरा करण्यात आला.



☞ **आरोग्य शिबीर :-** नालासोपारा मधील भीमडोंगरीमधील वस्तीत डॉ. रूनल परेरा तसेच दुमीबाई साळू वाझ चॅरिटेबल ट्रस्टच्या मदतीने डेंन्टल कॅम्पचे आयोजन केले गेले तसेच ठाण्यातील हरिओम चाळ मनोरमा नगर येथे कॅन्सर आणि HIV तपासणी कॅम्प आणि जीवन सहार केंद्रच्या सहाय्याने तर ART सेंटर च्या मदतीने कोंकणीपाडा येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.



☞ **अभ्यासदौरा :**

मांडवी मधील महिला सक्षमीकरण प्रशिक्षण कार्यक्रमातील नेतृत्व गुण असलेल्या महिलांकरीता मांडवी पोलिस दूरक्षेत्रात अभ्यासदौरा नेण्यात आला, विरार पोलिस स्टेशनचे PSI यावेळी श्री. शिवराम तुगाबे यांनी महिलांना सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी झालेल्या महिलांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

☞ **मांडवी, वाघोली आणि गास मधील नेतृत्वगुण असलेल्या महिलांचा अभ्यासदौरा :** प्रेमसेवा महिला को.

ऑ. क्रेडीट सोसायटी सांताक्रूझ येथे नेण्यात आला. महिलांमार्फत आणि महिलांसाठी चालविल्या जाणाऱ्या या सोसायटीची कार्यपद्धती, रचना आणि उद्देश ध्येय जाणून घेण्याचा प्रयत्न या माध्यमांतून महिलांनी केला.

## समन्वय

हिंसा मुक्त समाजाच्या निर्मितीसाठी सकारात्मक बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने पंचायत समितीच्या मदतीने शिवणसई, तडखड, वासळई, पोमण, अर्नाळा, कळंब, सत्पाळा या गावातील ग्रामसभेत हिंसामुक्त समाज निर्मितीची सकारात्मक प्रयत्नाकरीता शपथ घेऊन ठराव घेण्यात आला.



☞ We Action Group व chari च्या मासिक बैठकीत सख्यचा सहभाग.

☞ महाराष्ट्र महिला हिंसामुक्त परिषदमध्ये सख्यचा सहभाग.

☞ वस्तीकार्य आणि गटकार्य ह्या विषयांवर कर्मचाऱ्याकरीता राबविलेल्या कार्यशाळेत निर्मलानिकेतन कॉलेजच्या माजी प्राचार्या श्रीमती गीता बाळकृष्ण मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.



## आंतरराष्ट्रीय महिला हिंसा निर्मुलन मोहीम

महिलांवर होणारी हिंसा ही खाजगी बाब नसून सामाजिक समस्या आहे. भारतातील स्त्री पुरुष असमानता, पितृसत्ताक पद्धती, न्याय व्यवस्थेतील पद्धत प्रशासन व्यवस्था, पोलिस यंत्रणा, जाती व्यवस्था संस्कृती यासारख्या पद्धतीमुळे महिलांना लिंगभेदावर आधारीत अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. याबाबतीत सकारात्मक बदल घडवून आणण्याकरीता इतर सामाजिक संस्था, मानव अधिकार संविधानाला महत्त्व देणारे जागृत नागरिक अधिक परिश्रम घेत आहे. खऱ्या अर्थाने भारतात महिला सक्षमीकरण घडवून आणण्याकरीता समाजाच्या मानसिकतेत बदल घडविणे गरजेचे आहे, त्याकरीता केवळ महिलांनीच न बोलता त्यासोबत कणखर आवाजात पुरुषांचा सहभागही महत्त्वाचा आहे. हे लक्षात घेऊन 'सख्य' ने २५ नोव्हेंबर ते १० डिसेंबर या १६ दिवसीय आंतरराष्ट्रीय महिला हिंसा विरोधी जाणीव जागृती मोहीम राबविताना परिसरातील आठवडी बाजार, गजबलेल्या वस्त्यांमध्ये माहिती पत्रके व पथनाट्यामार्फत तसेच 'दार ठोठावणे' अभियानामार्फत जनजागृती केली त्याचबरोबर शाळा, कॉलेज व संस्थामध्ये, हॉस्पिटल येथे चर्चासत्र घेण्यात आले. सायकल रॅली काढण्यात आली. सोशल मडिया, वर्तमानपत्र, जाहिरात या सर्व माध्यमातून स्त्री आणि पुरुष एकाच स्थरावरून आपल्या विचारांचे अंदान प्रदान करू शकतात त्यामार्फत 'सख्य' ने जनजागृती करून जवळ जवळ २०००० लोकांपर्यंत 'हिंसामुक्त समाज निर्मिती ' चा संदेश पोहचविण्यात आला.






*With Best Compliments From*



*Together we can do great things*

## ST MOTHER TERESA PRE SCHOOL

**English Medium**

- Baby Sitting Care Home
- Play Group
- Nursery
- Junior Kg
- Senior Kg

**Address :**

**Silvister Smruthi, Kalamb Road Nirmal Naka**

**Mob.: 9975831597**

*With Best Compliments From*



## Larris Roman Fernandes

## Prabhavati ENT CENTRE

Reg. No. VVCMC/C-H-252/2017

**Dr. Sangamlal B. Pal - M.S. (ENT)**

Gold Medalist

Reg. No. 2006 04 2005

Assistant Honorary Bhagwati Municipal Hospital, Borivali.

Visiting Consultant Wockhardt Hospital, Mira Road.

Visiting Consultant Ramlok ENT Hospital, Bhayander.

Time : 1.00 pm to 3.00 pm & 5.00 pm to 9.00 pm

**FACILITIES AVAILABLE**

- Ear Microscopic Surgery
- Sinus Endoscopic Surgery
- Vertigo Centre
- Audiogram / Tympanogram / Speech
- Sleep Study
- Treatment for Snoring
- Voice Clinic Fibro-Optic Laryngoscopy
- Head and Neck Surgeries
- Cancer Surgeries
- Thyroid Surgeries

**Other Consultant Attached**

Dr. Narendra Sharma (On Call)

Dr. Chetan Gharat (On Call)

Dr. Sophia Jojo OPD Time - 9.00 am to 12 .00 pm

Speech Therapist & Audiologist

Subrat Pradhan, Ashok Pal, Ajay Pal

G-003, Chandresh Palace CHS Ltd., S.T. Depot Road, **NALLASOPARA (W) - 401 203**

**For Appointment Ph. : 0250 2400050, Mo. : 8879667559, 9324464644**

जी-००३, चंद्रेश पॅलेस को.ऑप.हौ.सो., एस.टी. डेपो रोड, नालासोपारा (वेस्ट)-४०१ २०३

**अपॉईंटमेन्टकरिता फो. : ०२५० २४०००५०, मो. : ८८७९६६७५५९, ९३२४४६४६४४**

**Website : www.prabhavatientcentre.com, Email : Prabhavatientcentre@gmail.com**

*With Best Compliments From*

**Mob.: 9821116898**

ADVOCATE

## John Elias Rodrigues

**B.A.LL.M.**

**ADVOCATE HIGH COURT**

**Family court Bar Association, 5th Floor,**

**Family Court Bandra**

**Bandra - Kurla Complex,**

**Bandra (E) Mumbai-400 051.**

With Best Compliments From



# Mrs Janet Peter Ghaviya
# &
# Fly

Uttan

With Best Compliments From



# Victor Pascal Rosario

## कार्डिनल ग्रेशिअस मेमोरियल हॉस्पिटल ट्रस्ट

बंगली, सांडोर, वसई (पू), जिल्हा - पालघर, ४०१२०१

दुरध्वनी क्रमांक : ७३५०६२२४२४/७३५०६३२४२४/०२५०- २३२५०१८/२३२५०१९



# मोफत तपासणी व औषध

# संत मदर तेरेसा ओपीडी

## गरीब रुग्णांसाठी मोफत

सोमवार ते शनिवार

(रविवार व सार्वजनिक सुट्टी सोडून)

**संध्याकाळी ४.३० ते ७.00**





# Tania Group of Hotels

Luxurious Accommodation

Hotel Tania Searock ★ ★ ★
Opp. Devka Garden, Devka Beach,
Nani Daman-396210.
M: +91 82389 23127 / 126
E: reservations@taniasearockhotel.com






Hotel Orchid Vue ★ ★ ★ ★
1A Street Bur Dubai P.O. box is 185170
Dubai, United Arab Emirates
M: +971 4 351 0004
E: info@orchidvuehotel.com



Hotel Tania President Inn ★ ★ ★
Sr.No 3-38 & 3-51, Near Saibaba
Temple, Shirdi 423109
M: +91 75177 75177
E: reservation@taniapresidentinn.com

www.taniagrouphotels.com

# साधना
## सहकारी पतपेढी मर्यादित

**मुख्य कार्यालय :** 'साधना भवन' आक्टण, सांडोर, वसई - ४०१ २०१.
दूरध्वनी : ०२५० - २३२३२२२, २३१०९०२ Email : gm@sspmonline.com

| आक्टण शाखा | होळी शाखा | गणनाका शाखा | माणिकपूर शाखा | सातिवली शाखा | रमेदी शाखा |
|---|---|---|---|---|---|
| २३१०७७६ / ८०८०९४०३८६ | २३२३२२९/ ८०८०९४०३८७ | २३२३२२४/ ८०८०९४०३८८ | ८०८०९४०३९० | ८०८०९४०३९१ | ८०८०९४०३८९ |

### कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध

| सहज, सुलभ गृह कर्ज | तात्काळ वाहन कर्ज | जलद सोने तारण कर्ज | वैयक्तिक तारण कर्ज | मशिनरी, शॉप, गाळे, इ. कर्ज | वैयक्तिक पतकर्ज |
|---|---|---|---|---|---|
|  |  |  |  |  |  |
| 9.50 | 9.50% | 10.50% | 11% | 11% | 11.75% |

मुदत ठेवीवर त्रैमासिक किंवा मासिक बचत खाती (१८ महिने) - सामान्यासांठी ७.७५% व ज्येष्ठ नागरिकांसाठी ८%

**एकूण मिश्र व्यवसाय रु. २६६,००,००,०००/-**

- नवीन सीबीएस प्रणाली द्वारे आपल्या सेवेस तत्पर
- संस्थेच्या ग्राहकांना कोणत्याही शाखेतून व्यवहार करणे शक्य (Any Branch Banking)
- व्यवहार केल्यानंतर त्वरीत मोबाईलवर संदेश (Real Time Transaction SMS)
- दैनंदिन ठेवीसाठी ऑनलाईन मोबाईल ॲप
- खात्याचे स्टेटमेंट इमेलद्वारे पोहोचविण्याची सोय

| श्री. अशोक कोलासो | श्री. लेस्ली डिसिल्वा | श्री. आर्थर कुटीनो |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | जन. मॅनेजर |

### संचालक मंडळ

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| श्री. आल्बर्ट अथाईड | श्री. नील कुटीनो | श्री. नॅप डिसोजा | श्री. जोजेप मच्याडो | सौ. इस्पारांस डायस | श्री. राजेश सजन |
| श्री. विन्सेंट आल्मेडा | श्री. समीर पाटील | श्री. फ्रान्सिस मिस्कीटा | श्री. मदन पाटील | सौ. सिल्व्ही परेरा | श्री. संजय डाबरे |
| | | | | | श्री. थॉमस परेरा |

संस्थेच्या आक्टण शाखेत लॉकर सुविधा उपलब्ध आहे.

BASSEIN CATHOLIC
CO-OPERATIVE BANK LTD

ESTD. 1918

# A SMALL PERCENTAGE CAN HELP YOU SAVE BIG NUMBERS

Switch your existing business loan to
**BCCB's MSME Udyog Vikas Loan Scheme.**

***Features of MSME Udyog Vikas Loan Scheme:**

- Concession up to 1.50% from prevailing ROI
- Zero processing fee



* T & C Apply

VENTURES

Connect with us: f | www.bccb.co.in

Head Office - Catholic Bank Building, Papdy Naka, P. O. Papdy, Vasai (W) - 401 207.
Call: 0250 2322053 / 9527441600 I Toll free no: 1800 233 6000

# MOST PROMISING COMPANY OF THE YEAR!

# RBL BANK




## CNBC TV18 India Business Leader Awards - 2018

### Some Of Our Important Accolades

**CNBC ASIA — INDIA TALENT MANAGEMENT AWARD**
India Talent Management Award from CNBC Asia **(2017)**

**EY Entrepreneur Of The Year — ENTREPRENEUR OF THE YEAR AWARD**
Vishwavir Ahuja recognized as 'EY Entrepreneur of the Year' in the Financial Services Category **(2016)**

**WORLD ECONOMIC FORUM — GLOBAL GROWTH COMPANY AWARD**
Recognized by World Economic Forum as a 'Global Growth Company' **(2014)**

**Business Today — BEST SMALL BANK AWARD**
Business Today-KPMG Study Best Bank-Growth 2012-16 Best Small Bank 2017 **(2012 to 2017)**

**BW BUSINESSWORLD — FASTEST GROWING SMALL BANK AWARD**
Business World Study India's Fastest Growing Small Bank **(2013 to 2017)**

RBL Bank is almost 75 year old, but only 7 years young in our current avatar. During this period, the bank has grown by almost 40 times in size and over 50 times in profits. We have put together a best in class institution to deliver best in class banking services, grounded on the principles of strong governance, best professional standards and an ethical value system. We are overwhelmed by the support and good wishes from all our stakeholders.

**Thank You!**

*apno ka bank* | RBL BANK

**Call:** 1800 123 8040 | **Visit:** www.rblbank.com | **Write:** customercare@rblbank.com
**CIN** L65191PN1943PLC007308

9765874493